आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
गुरुवार, दिनांक ०९ मे २०२४

ठळक बातम्या

1. आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार, अमरावती जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा होणार सन्मान.
2. नागपूर जिल्ह्यातील भुकंप अतिशय सौम्य प्रकारचे, नागरिकांनी घाबरून न जाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांचे आवाहन.
3. आयआयएम नागपूरचा दीक्षांत सोहळा येत्या ११ मे रोजी.
4. नागपुरात अवकाळी पावसाची जोरदार हजेरी, येत्या १२ तारखेपर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट.

*****

पद्म पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. त्यात अमरावती जिल्ह्यातील वझ्झरचे सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा समावेश आहे. दिव्यांग आणि गरजू त्यांची निस्वार्थ भावनेने सेवा हा त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. या आधी २२ एप्रिलला राष्ट्रपतींनी तीन पद्मविभुषण, आठ पद्मभूषण तसंच ५५ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केले होते.

एयर इंडिया

विमान उड्डाणं रद्द केल्याप्रकरणी नागरी उड्डयन मंत्रालयानं एयर इंडिया एक्सप्रेसला स्पष्टीकरण अहवाल मागितला असून या प्रकरणाचा तातडीनं निपटारा करण्याची सूचना केली आहे. मंत्रालयानं एयर इंडिया एक्सप्रेसला नागरी उड्डयन महानिदेशालयाच्या नियमांनुसार प्रवाशांसाठी आवश्यक त्या सुविधा सुनिश्चित करण्यासही सांगितलं आहे. आजारी असल्याचं कारण देत अनेक वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेतल्यामुळं कालपासून एयर इंडिया एक्सप्रेसची अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली, तर काही उड्डाणांना आज सकाळपर्यंत उशीर झाला होता.

__शरदचंद्र पवार__

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांना काँग्रेसमध्ये विलीनीकरणाशिवाय पर्याय नसल्याचा दावा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. अहमदनगरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उद्धव ठाकरे हे हिंदुत्वापासून दूर गेले आहेत आणि ते काँग्रेसच्या विचारांशी सहमत आहेत. त्यामुळंच त्यांनी अजमल कसाब संदर्भात काँग्रेसनं केलेल्या वक्तव्याबाबत कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही, असा आरोप बावनकुळे यांनी केला. शरद पवार यांच्या हातातून बारामती आणि पश्चिम महाराष्ट्र गेला असल्यानं ते इतरांची मदत घेत असल्याचा दावा त्यांनी केला.

__भूकंप नागपूर झोन__

नागपूर जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून कमी तीव्रतेच्या भूकंपाची नोंद होत आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागानुसार नागपूर जिल्ह्यातील भूकंप हे अतिशय सौम्य प्रकारचे भूकंप आहेत. यातून कोणतीही हानी होणार नाही आणि नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही, असं जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविलं आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरण्याची गरज नसून सावधगिरी म्हणून थोडी खबरदारी घ्यावी. अधिक माहितीकरिता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी 0712-2562668 या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे. मार्च आणि मे महिन्यात सौम्य भूकंपाच्या थोड्या फरकानं होणाऱ्या नोंदीमुळं संपूर्ण नागपूर जिल्ह्याची सूक्ष्म भूकंप तपासणी आणि अभ्यास करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाला विनंती करण्यात आली असल्याचे डॉ. इटनकर यांनी स्पष्ट केलं. पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्या 'राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्रे' या पोर्टलवर नागपूर जिल्ह्यात मार्च महिन्यापासून एकूण 9 भूकंप, तर गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात 2 भूकंपाची नोंद करण्यात आली. या भूकंपाची तीव्रता अत्यल्प म्हणजे २ ते २.८ रिष्टर स्केलमध्ये होती.

__**ॲ**ड.धर्मपाल मेश्राम__

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल बेजबाबदार, भडकावू आणि देशद्रोही वक्तव्य करणारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट नेते संजय राऊत यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष **ॲ**ड. धर्मपाल मेश्राम यांनी नागपुरात केली आहे. **ॲ**ड. मेश्राम यांनी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र आणि नागपूर पोलिस आयुक्त यांना तक्रारीसंदर्भात पत्र पाठविलं आहे. संजय राऊत यांनी

अहमदनगर इथल्या  जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल धमकावणाऱ्या भाषेत वक्तव्य केलं होते.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा'

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'पालघर' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

दीक्षांत सोहळा आयआयएम

आयआयएम नागपूरचा आठवा वार्षिक दीक्षांत समारोह येत्या शनिवारी 11 मे रोजी होणार असून या दीक्षांत सोहळयासाठी पर्सिस्टंट सिस्टमचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. याशिवाय आयआयएम नागपूरच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष तसंच टेक महिंद्रा या कंपनीचे माजी व्यवस्थापकीय संचालक सी पी गुरुनानी आणि आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मैत्री यांची देखील यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. या सोहळयात एमबीए आणि एक्झिक्युटिव्ह एमबीए अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना बेस्ट स्कॉलिस्टिक अचीवमेंट अवॉर्ड या पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार असून मेरिट आलेल्या विद्यार्थ्यांना तसंच एकंदर चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बेस्ट ऑल राऊंड परफॉर्मन्स अवॉर्ड देण्यात येणार आहे.

विमानसेवा

अमरावती इथून विमानसेवा सुरू होण्याच्या दृष्टीनं विमानतळाची प्रलंबित कामं कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेनं समन्वयानं काम करावं. अमरावतीमध्ये अत्याधुनिक विमानतळ निर्माण होण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी मिशनमोडवर कामं पूर्ण करून प्रकल्प पूर्णत्वास न्यावा,  असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन इथं बेलोरा विमानतळ संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. विमानतळाच्या अद्ययावतीकरणाची जबाबदारी शासनानं 'एमएडीसी'कडं सोपविलेली आहे. त्यानुसार विमानतळावर एटीआर-72 किंवा तत्सम प्रकारची विमानं उतरण्याची सोय होण्यासाठी धावपट्टी विस्तार आणि रात्रीच्या वेळी  विमानं उतरण्यासाठी आवश्यक सुविधा तातडीनं पूर्ण होण्यासाठी संबंधित विभागानं समन्वयानं काम करावं, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## यूपीएससी

केंद्रीय लोकसेवा आयोग-यूपीएससी मार्फत घेतलेल्या इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस-आय.एफ.एस परीक्षेत, लातूरच्या प्रतिक्षा काळे यांनी महाराष्ट्रात पहिला, तर देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. सध्या त्या मेळघाटात वन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा येत्या सहा जुलै रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातल्या एकूण ५२४ पदांचा सुधारित सविस्तर तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## अक्षय्य तृतीया

वैशाख शुद्ध तृतीया अर्थात अक्षय्य तृतीयेचा सण उद्या साजरा करण्यात येणार आहे. अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त हा महत्त्वाच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त समजला जातो. या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभकार्याचं फळ 'अक्षय्य' अर्थात न संपणारं असतं, असं अशी मान्यता आहे. अक्षय्य तृतीयेला सोन्या-चांदीच्या खरेदीला महत्त्व आहे. याकरता नागपुरातील सराफा बाजारपेठा सजल्या आहेत, तर माठ आणि पूजेचं साहित्य देखील बाजारात मोठ्या प्रमाणात विक्रीला आलं आहे.

## वसुधा वैद्य यांच्या ‘वारी’ कादंबरीचे प्रकाशन

विदर्भ साहित्य संघ आणि कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानं डॉ. वसुधा वैद्य यांच्या ‘वारी’ या कादंबरीचा प्रकाशन समारंभ शनिवार, दि. 11 मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. वि. सा. संघाच्या अमेय दालनात सायं. 6 वाजता हा कार्यक्रम होत आहे. प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते राहणार असून 97 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

## ज्वारी केंद्र

यंदा अकोला जिल्ह्यात 14 हजाराहून अधिक एकर क्षेत्रावर उन्हाळी ज्वारीची लागवड झाली आहे. त्यामुळे साधारणतः 20 हजार टन उत्पादनाची अपेक्षा आहे. आतापर्यंत अकोला जिल्ह्यातील बाजार समितीमध्ये 2 हजार 518 टन ज्वारीची आवक झाल्याची माहिती असून या ज्वारीला हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यानं शेतकऱ्यांचं नुकसान होत आहे.

दुसरीकडं शासकीय ज्वारी खरेदी केंद्र सुरू न झाल्यामुळं बळीराजा हवालदिल झाल्याचा आरोप शेतकरी जागर मंचाचे संयोजक प्रशांत गावंडे यांनी केला आहे. सध्या बाजार समितीत ज्वारीचा बाजार भाव किमान 18 शे 50 रुपये ते कमाल 23 शे 70 रुपये आहे. सरकारनं यावर्षीचा हमीभाव 2 हजार 990 प्रति क्विंटल जाहीर केला असून सरासरी क्विंटलमागं 880 रुपयांचं नुकसान शेतकऱ्यांना सहन करावं लागत असल्याचं गावंडे यांनी सांगितलं.

<u>वस्तूंचा तुटवडा</u>

पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये तणाव वाढत आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या तुटवड्यासंदर्भात येत्या ११ तारखेला होणारं विरोध प्रदर्शन थांबवण्यासाठी पाकिस्तान प्रशासन पंजाब प्रांतच्या सैनिकांना या भागात तैनात करत असल्यानं हा तणाव वाढत आहे. यूनाइटेड कश्मीर पीपल्स नॅशनल पक्ष आणि संयुक्त अवामी **ॲ**क्शन कमेटीनं शांततेच्या मार्गानं विरोध प्रदर्शन करणाऱ्यांवर कोणतीही जाचक कारवाई करू नये, असं पाकिस्तान प्रशासनाला सूचित केलं आहे. हा विरोध दर्शवणाऱ्या आंदोलकांविरुद्ध बळाचा वापर करण्यात आल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर विरोध प्रदर्शित करण्याचा इशाराही या दोन पक्षांनी दिला आहे.

<u>ऑरेंज अलर्ट/हवामान</u>

नागपूर शहरात आज सकाळी बराच वेळ मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस झाला. या अवकाळी पावसामुळं शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांना फटका बसला आहे. भारतीय हवामान खात्यानं जिल्ह्यामध्ये आज वादळीवारा, वीज, गारपीट आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली असून ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर १० ते १२ मे या कालावधीसाठी येलो अलर्ट दिलेला असून या दिवशी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह वादळीवारा आणि वीज गर्जनेची शक्यता वर्तवली आहे. या अनुषंगानं जिल्ह्यातील नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे. नागपुरात नुकतंच तापमान ४३ अंश सेल्सिअसवर पोहोचलं होतं. भंडारा जिल्ह्याला हवामान विभागानं पुढचे ३ दिवस येलो अलर्ट जारी केला आहे. दोन दिवसांपूर्वी देखील जिल्ह्याला अवकाळी पावसानं झोडपून काढलं होतं. आज सकाळपासूनच पुन्हा ढगाळ वातावरण झालं होतं. या पावसाचा फटका रब्बी पिकांना बसणार आहे.

यवतमाळमध्ये आगामी काही तासात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता असून  अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशीम इथं तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

*****